ePaper
॥ वर्ष - 7 । अंक - 343 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥
महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com गुरुवार, दिनांक 13 जून 2024 पिंपरी-चिंचवड आवृत्ती mahaenews.com maha_enews Mahaenews

# हे माझं शेवटचं उपोषण... मनोज जरांगेंचा सरकारला इशारा!



## आतील पानांत


- सौरभ नेत्रावळकरने रचला इतिहास!
- अमेरिकेने टाकली मान
- शाहरूखच्या जबरा फॅनची कमाल!
- 40 भारतीयांचा होरपळून मृत्यू!


## आमदार सुनील शेळके यांच्या प्रयत्नाला यश

# पवना धरणग्रस्तांना अखेर न्याय!

## प्रत्येक खातेदाराला चार एकर जमीन देण्याचा निर्णय

। पिंपरी । महाईन्यूज

**मावळ तालुक्यातील पवना धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री .अनिलजी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आमदार सुनील शेळके, अधिकारी व धरणग्रस्त शेतकरी यांच्यासमवेत संयुक्त बैठक उत्साहात पार पडली. यावेळी 'प्रत्येक खातेदाराला चार एकर जमीन देण्याचा निर्णय मंत्री महोदयांनी दिला असून, दोन एकर क्षेत्र मावळ तालुक्यात व दोन एकर क्षेत्र दुसऱ्या तालुक्यात देण्याचे निश्चित केले आहे. शेतकऱ्यांना त्यांचा हक्क मिळाल्याचे समाधान असल्याचे आमदार सुनील शेळके यांनी व्यक्त केले. तसेच मावळच्या स्थानिक भूमिपुत्रांच्या व धरणग्रस्त शेतकरी कुटुंबियांच्या वतीने महायुती सरकारचे मनःपूर्वक आभार मानले.**



### पुढील 8 दिवसात अंमलबजावणी...

"सुमारे पन्नास वर्षांपूर्वी पवना धरणासाठी मावळातील स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहित करण्यात आल्या.या प्रकल्पातील काही बाधित खातेदारांचे पुनर्वसन करण्यात आले.परंतु उर्वरित खातेदार मागील अनेक वर्षांपासून पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत होते. हा प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी मागील चार वर्षांपासून आमदार सुनील शेळके सातत्याने पाठपुरावा करीत आहे.अधिवेशनात देखील हा प्रश्न मांडला, मंत्रालय स्तरावर तसेच विभागनिहाय संयुक्त बैठका घेतल्या,आंदोलनात सहभागी झालो.अखेर आज झालेल्या बैठकीत पुनर्वसन मंत्री यांनी शिक्कामोर्तब केले आणि शेतकऱ्यांसोबत घेतलेल्या प्रयत्नांना सकारात्मक यश मिळाले आहे."

### बैठकीत झालेले सकारात्मक निर्णय :-

पवना धरणग्रस्त प्रत्येक खातेदाराला चार एकर क्षेत्र वाटप करण्यात येणार., दोन एकर क्षेत्र धरण परिसरात देण्यात येणार., दोन एकर क्षेत्र जिल्ह्याच्या इतर ठिकाणी., एकूण ७६४ खातेदारांना सुमारे १८३९ एकर क्षेत्रापैकी १५२८ क्षेत्र पहिल्या टप्प्यात वाटप करण्यात येणार आहे.

तसेच सुमारे ३११ एकर क्षेत्रामध्ये रस्ते, ओढे, नाले, वने व धरण सुरक्षेकरिता क्षेत्र ठेवले जाणार आहे.,ज्या शेतकऱ्यांकडे पुरावे आहेत परंतु ते खातेदार नाहीत,अशा शेतकऱ्यांना देखील समाविष्ट केले जाईल. त्या शेतकऱ्यांनी सर्व माहिती व कागदपत्रांसह पुनर्वसन उपजिल्हाधिकारी यांच्याकडून संपूर्ण प्रस्ताव आठ दिवसांमध्ये पुनर्वसन विभागाकडे मंत्रालय स्तरावर पुढील आठ दिवसात सादर करण्याचे निर्देश .मंत्री महोदयांनी दिले आहेत.

> पवना धरणग्रस्तांचा प्रश्न अखेर 55 वर्षांनी मार्गी लागला मागील साडेचार वर्षापासून मी सातत्याने प्रयत्न करीत होतो. यासाठी अधिवेशनात देखील अनेक वेळा आवाज उठवला अखेर पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांनी या निर्णयावर शिक्कामोर्तब केले.
>
> -सुनील शेळके, आमदार

याबैठकीला आमदार सुनील शेळके, पवना धरणग्रस्त संयुक्त समितीचे अध्यक्ष नारायण बोडके, संजय खैरे, बाळासाहेब मोहोळ, लक्ष्मण काळे, मुकुंदराज काऊर, संतोष कडू, दत्तात्रय ठाकर, रामभाऊ कालेकर आदी स्थानिक शेतकरी व सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## भोसरी, चिंचवड विधानसभेच्या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेसचा दावा

## महायुतीत तिढा वाढणार, अजितदादांची याला संमती असणार?

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्धापन दिनी मेळाव्यात छगन भुजबळ यांनी आगामी विधानसभा निवडणुकीत शिंदे गटाला मिळतील, तितक्याच अजित पवारांच्या राष्ट्रवादीला जागा मिळाव्यात, अशी मागणी केल्यानंतर महायुतीत वादाची ठिणगी पडली आहे. आता पिंपरी चिंचवड शहरातील भाजपच्या दोन जागांवर राष्ट्रवादीने थेट हक्क दाखवला आहे. अजित पवारांची सुद्धा याला संमती असणार आहे, असा दावाही इच्छुक उमेदवारांनी केला आहे. त्यामुळे महायुतीत तिढा वाढण्याची दाट शक्यता आहे.**



भोसरीत भाजपचे महेश लांडगे, तर चिंचवडमध्ये भाजपच्या अश्विनी जगताप आमदार आहेत. असं असताना भोसरीच्या जागेवर पिंपरी चिंचवड राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे आणि चिंचवडच्या जागेवर नाना काटे यांनी दावा केला आहे. गव्हाणे आणि काटे यांनी राष्ट्रवादीच्या वर्धापन दिनी अजित पवारांकडे तशी मागणी केली असून अजितदादांची याला संमती असणार, असा दावाही या दोघांनी केला आहे. दरम्यान, पिंपरी चिंचवड राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे म्हणाले की, भोसरी हा राष्ट्रवादीचा मतदारसंघ आहे. विलास लांडे पाटील यांनी दोनवेळा या मतदारसंघाचे नेतृत्व केले आहे. या मतदारसंघात आमच्या पक्षाची ताकद अत्यंत चांगली आहे. त्यामुळे स्वत: मी इच्छूक आहे, त्यामुळे आम्हाला ही जागा मिळावी, अशी आशा असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, भाजपचा आमदार असला, तरी दावा केल्याने तिढा निर्माण होईल असे वाटत नाही, असेही त्यांनी सांगितले.

### नाना काटेही राष्ट्रवादीसोबत...

चिंचवडच्या जागेवर दावा केलेल्या नाना काटे यांनीही चिंचवडमध्ये राष्ट्रवादी सोबत असल्याचे सांगितले. जो काही विकास झाला आहे तो विकास अजितदादांच्या माध्यमातून झाला आहे. त्यामुळे राष्ट्रवादी भक्कम असल्याचे ते म्हणाले. सर्व कार्यकर्ते सोबत राहतील, असेही ते म्हणाले.

# रिंगरोडचे भूमीपूजन होणार कधी?

## विधानसभा निवडणुकीपूर्वी होण्याची शक्यता

।पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) प्रस्तावित केलेल्या रिंगरोडचे भूमिपूजन विधानसभा निवडणुकीपूर्वी होण्याची दाट शक्यता आहे. विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता लागल्यानंतर या रस्त्याचे काम विनाअडथळा सुरू राहण्यासाठी त्यापूर्वीच भूमिपजून करून प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याचा राज्य शासनाचा मानस आहे.**



पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी रस्ते महामंडळाकडून १७२ किलोमीटर आणि ११० मीटर रुंदीचा रिंगरोड हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाचे पूर्व आणि पश्चिम असे दोन भाग करण्यात आले आहेत. पूर्व मार्गातील मावळ तालुक्यातून ११, खेड १२, हवेली १५, पुरंदरमधील पाच आणि भोरमधील तीन गावांतून प्रस्तावित आहे, तर पश्चिम मार्गावरील भोर तालुक्यातील एक, हवेली ११, मुळशी १५ आणि मावळ तालुक्यातून सहा गावे बाधीत होणार आहेत. पश्चिम मार्गावरील ३४ गावांपैकी ३१ गावांमधील ६४४ हेक्टर जमिनीच्या संपादनाचे काम पूर्ण झाले आहे. त्यासाठी २९७५ कोटी रुपये मोबदला दिला आहे.भोर तालुक्यातील पाच गावे वगळून शिवरे गावाचा समावेश झाल्याने या गावातील मूल्यांकनाचे दरनिश्चितीचे काम झाले आहे. पश्चिम मार्गाच्या भूसंपादनासाठी यापूर्वीच गृहनिर्माण आणि नागरी विकास महामंडळाकडून (हुडको) दहा हजार कोटींचे कर्ज घेण्यात आले आहे. या माध्यमातून पश्चिम मार्गाचे बहुतांश भूसंपादन मार्गी लागले आहे. पूर्व मार्गाच्या भूसंपादनासाठी रस्ते महामंडळाला निधीची गरज होती. त्यानुसार महामंडळाने राज्य सरकारकडे निधीची मागणी केली होती. त्यानुसार राज्याचे उपमुख्यमंत्री आणि वित्तमंत्री पवार यांनी अंतरिम अर्थसंकल्पात रिंगरोडच्या भूसंपादनासाठी तब्बल दहा हजार ५१९ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यानंतर जिल्हा प्रशासनाकडून या प्रकल्पाच्या पूर्व मार्गातील खेड आणि हवेली तालुक्यातील जमिनींच्या संपादनाबाबत निवाडा जाहीर करण्यात आला आहे.दरम्यान, पश्चिम मार्गातील केवळ दोन-तीन गावांतील किरकोळ भूसंपादन बाकी आहे.

### सहा गावे बाधीत होणार आहेत

तर पूर्व मार्गाचे भूसंपादन वेगाने करण्यात येत आहे. त्यामुळे पुढील महिनाअखेरीस भूसंपादन पूर्ण करून विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वीच या रस्त्याच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात येणार आहे.रिंगरोडसाठी पश्चिम मार्गाचे बहुतांश भूसंपादन पूर्ण झाले आहे. पूर्व मार्गाचे भूसंपादन प्रगतीपथावर आहे. जुलैअखेरपर्यंत भूसंपादन पूर्ण करण्याचा जिल्हा प्रशासनाचा मानस आहे. सातत्याने या प्रकल्पाच्या भूसंपादनाबाबत बैठक घेऊन आढावा घेण्यात येत आहे, असे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी सांगितले.पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी रस्ते महामंडळाकडून १७२ किलोमीटर आणि ११० मीटर रुंदीचा रिंगरोड हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाचे पूर्व आणि पश्चिम असे दोन भाग करण्यात आले आहेत. पूर्व मार्गातील मावळ तालुक्यातून ११, खेड १२, हवेली १५, पुरंदरमधील पाच आणि भोरमधील तीन गावांतून प्रस्तावित आहे, तर पश्चिम मार्गावरील भोर तालुक्यातील एक, हवेली ११, मुळशी १५ आणि मावळ तालुक्यातून सहा गावे बाधीत होणार आहेत.

# जिल्ह्याला जोडणाऱ्या पुलाचे बांधकाम निकृष्ट

## 20 कोटी रुपये खर्च ; सार्वजनिक बांधकाम विभागाची कबुली

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुणे-नगर जिल्ह्याला जोडणाऱ्या भीमा नदीवरील निर्माणाधीन पुलाचे खांब कोसळल्याची घटना तीन दिवसांपूर्वी घडली. या पुलाचे काम निकृष्ट झाल्याची कबुली सार्वजनिक बांधकाम विभागाने दिली असून आता नव्याने काम हाती घेण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले.**



दौंड शहरातून वाहणाऱ्या भीमा नदीवर दौंड शहर ते नगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील गार दरम्यान सुमारे २० कोटी रुपये खर्च करून हा पूल उभारण्यात येत आहे. सध्या दौंड येथून नदीपात्रातून होडीमार्गे गार व त्यापुढील गावांना जावे लागते. दौंड शहराला गारमार्गे नगर जिल्ह्यातील आर्वी, अजनूज आदी गावे या प्रस्तावित पुलामुळे जोडली जाणार आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या पुलाचे काम सुरू आहे. उन्हाळ्यामुळे धरणातील पाणी आटल्याने नदीपात्रात कमी पाणी आहे. या पुलाचे दोन मोठे खांब पाया कच्चा असल्याने कोसळले. या पुलाच्या बांधकामाच्या दर्जाबाबत स्थानिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रारी केल्या होत्या.नदीपात्रात पाणी नसताना पुलाच्या काही खांबांचे कॉंक्रिट पूर्णपणे निघून त्यातील लोखंडी सळ्या दिसत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते. तसेच हे निर्माणाधीन खांब एका बाजुला कलल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले होते. अखेर हे दोन खांब कोसळल्याची घटना घडली. नदीपात्रातील अन्य दोन खांबांच्या वरच्या बाजूला तडे गेले असून खालच्या बाजूचे कॉंक्रिट निघून गेले असल्याचेही स्थानिकांकडून सांगण्यात येत आहे. खांब कोसळल्यानंतर सार्वजनिक बांधकाम पुणे विभागाचे अतुल चव्हाण आणि इतर अभियंत्यांनी भेट देऊन पाहणी केली.दौंड येथील भीमा नदीवर बांधण्यात येणारा पूल कोसळल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून माहिती घेतली. पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले होते. त्यामुळे तो पाडून टाकण्यात आला असून आता नव्याने हे काम हाती घेण्यात येणार असल्याचे सार्वजनिक बांधकाम पुणे विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांनी सांगितले. याबाबत स्थानिक नागरिकांमध्ये रोष असल्याने तातडीने या प्रकाराची माहिती देण्याचे आदेश त्यांना देण्यात आले आहेत, असे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी सांगितले.

### सुमारे 20 कोटी रुपये खर्च

दौंड शहरातून वाहणाऱ्या भीमा नदीवर दौंड शहर ते नगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील गार दरम्यान सुमारे २० कोटी रुपये खर्च करून हा पूल उभारण्यात येत आहे. सध्या दौंड येथून नदीपात्रातून होडीमार्गे गार व त्यापुढील गावांना जावे लागते. दौंड शहराला गारमार्गे नगर जिल्ह्यातील आर्वी, अजनूज आदी गावे या प्रस्तावित पुलामुळे जोडली जाणार आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या पुलाचे काम सुरू आहे. उन्हाळ्यामुळे धरणातील पाणी आटल्याने नदीपात्रात कमी पाणी आहे. या पुलाचे दोन मोठे खांब पाया कच्चा असल्याने कोसळले. नदीपात्रात पाणी नसताना पुलाच्या काही खांबांचे कॉंक्रिट पूर्णपणे निघून त्यातील लोखंडी सळ्या दिसत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते.

# पावसाळापूर्व कामांसाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना 'अल्टिमेटम'!

## भोसरीत भाजपा आमदार महेश लांडगे यांची आढावा बैठक

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भोसरी विधानसभा मतदार संघातील पावसाळी पूर्व कामे आगामी ८ दिवसांत मार्गी लावा. रस्ते खोदाई नियमावलीची कठोर अंमलजावणी करावी आणि नागरी आरोग्याच्या दृष्टीने साथीचे रोग प्रतिबंधक औषध फवारणी करावी, अशा सूचना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी दिल्या आहेत.**

### आठ दिवसांत कामे मार्गी लावण्याची अधिकाऱ्यांना सूचना



पिंपरी-चिंचवड महापालिका फ-क्षेत्रीय कार्यालयात पावसाळा पूर्व कामांचा आढावा घेण्यासाठी बैठक घेण्यात आली. यावेळी स्थापत्य विभागाचे मुख्य शहर अभियंता मकरंद निकम यांच्यासह फ-क्षेत्रीय अधिकारी सिताराम बहुरे, स्थापत्य, आरोग्य, उद्यान, वैद्यकीय आदी विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

भोसरी मतदार संघातील चिखली गावठाण, पाटीलनगर, मोरेवस्ती, घरकुल, कृष्णानगर, यमुनानगर, त्रिवेणीनगर, तळवडे गावठाण, रुपीनगर, सहयोगनगर, शिवतेजनगर आदी परिसरातील पावसाळा पूर्व कामे आणि प्रलंबित विकासकामे याबाबत बैठकीत आढावा घेण्यात आला. यावेळी सर्व माजी नगरसेवक, सर्वपक्षीय पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

नालेसफाई, पावसाळी पाणी निचरा व्यवस्था, रस्ते खोदाई नियमावलीची अंमलबजावणी, वृक्ष छाटणी, धोकायदायक वृक्ष हटवणे यासह आपत्ती व्यवस्थापन आदी विविध मुद्यांवर या बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. आगामी ८ दिवसांत रस्त्यांच्या दुरूस्तीची कामे पूर्ण करावीत, तसेच पथदिवे आणि साथीच्या रोगांवर नियंत्रण मिळवण्यासाठी औषध फवारणी करावी, असे आदेश प्रशासनाला दिले आहेत. यावेळी प्रभागातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनीही प्रशासनाला सूचना आमदार महेश लांडगे यांनी केल्या आहेत.

> पावसाळा पूर्व कामे पूर्ण करावीत आणि सर्वसामान्य नागरिकांना भेडसावणाऱ्या वाहतूक समस्या, पूरपरिस्थितीत मदतकार्य आणि नागरी आरोग्याच्या तक्रारींबाबत महापालिका प्रशासनाने प्राधान्याने कार्यवाही करावी. अवकाळी पावसामुळे काही ठिकाणी पाणी साचले होते. त्यामुळे नालेसफाई, पावसाळी पाणी निचरा व्यवस्था आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. नागरिकांना सक्षमपणे पायाभूत सोयी-सुविधा देण्यासाठी प्रशासनाने कार्यक्षमपणे काम करावे, अशा सूचना केल्या आहेत. **– महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

---

# हिंजवडी-वाकड रस्त्यावर भरधाव कारने तरुणीला उडविले!

## तब्बल 20 दिवसानंतर कार चालकावर गुन्हा दाखल

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**हिंजवडी-वाकड रस्त्यावरील अपघाताचा एक सीसीटीव्ही व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आणि तब्बल २० दिवसांनी या अपघातासंदर्भात हिंजवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर सीसीटीव्ही व्हिडीओ व्हायरल झाला होता. यानंतर हिंजवडी पोलीस खडबडून जागे झाले आणि त्यांनी अपघातात जखमी झालेल्या तरुणीच्या भावाला बोलवून तक्रार घेतली आहे. या घटनेप्रकरणी उत्कर्ष परदेशी याने फिर्याद दिली असून वाहनचालक तुषार नेमाडे याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**





पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्याद यांची बहीण आकांक्षा ही २३ मे २०२४ रोजी दुपारी साडेचारच्या सुमारास हिंजवडीकडून वाकडकडे जाणाऱ्या मार्गावर पुलाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेने चालत जात होती. त्यावेळी या रस्त्यावरील बसथांब्याजवळ माउली स्नॅक्स दुकानासमोर आकांक्षा चालत जात असताना तुषार नेमाडे याने त्याच्या ताब्यातील कार भरधाव आणि बेदरकारपणे चालवून आकांक्षा हिला पाठीमागून जोरदार धडक दिली. यात आकांक्षा जखमी झाली होती.

२३ मे रोजी अपघात घडला, त्या दिवशी आकांक्षावर उपचार करण्यासाठी तातडीने रुग्णालयात घेऊन जाण्यात आलं होतं. अपघातानंतर तरुणी घाबरली होती. त्यानंतर तरुणी आणि तिचा भाऊ हे मुंबईला निघून गेले म्हणून या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला नाही, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक कन्हैया थोरात यांनी दिली. परंतु, सोशल मीडियावर सीसीटीव्ही व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर अखेर आज पोलिसांनी आकांक्षाच्या भावाला बोलवून तक्रार घेतली आहे.

याबाबत फिर्यादी उत्कर्ष परदेशी याबाबत म्हणाले, अपघातामध्ये माझी बहीण आकांक्षा हिला मुका मार लागला. त्यानंतर आम्ही मुंबईला आलो. ती सध्या नॉर्मल असून काही दिवस आराम करण्याबाबत डॉक्टरांनी सांगितले आहे. अपघात प्रकरणी आम्ही फिर्याद दिल्यानुसार गुन्हा दाखल झाला आहे.

# महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी घेतलेले सर्व निर्णय, कामांचे फिजिकल ऑडिट करा: भापकर

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज





महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या प्रशासकीय राजवटीत दोन ते अडीच हजार कोटींचा भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी केला आहे. आयुक्त शेखर सिंह यांनी त्यांच्या राजवटीत घेतलेल्या सर्व निर्णयांची व झालेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी (फिजिकल ऑडिट) करावे. तसेच या चौकशीत जे दोषी आढळतील त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. मारुती भापकर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी १३ मार्च २०२२ पासून आजपर्यंत प्रशासक म्हणून जे निर्णय घेतले आहेत. ते निर्णय घेत विविध विकास कामांमध्ये सुमारे दोन ते अडीच हजार कोटींचे गैरव्यवहार व भ्रष्टाचार झाले आहेत. महापालिकेचे मुख्यालयाची इमारत, मोशी येथील हॉस्पिटल, अर्बन स्ट्रीट ,सिमेंट रस्ते विकास, रस्ते सुशोभीकरण, रस्ते यांत्रिकी पद्धतीने साफ सफाई, विविध कामांसाठी रस्ते खोदाई, सीसीटीव्ही कॅमेरे खरेदी, विविध विकास प्रकल्पाचे देखभाल दुरुस्ती, उद्यानाची नूतनीकरण दुरुस्ती, बहुचर्चित वाकड येथील सुमारे दीड हजार कोटीचा टीडीआर घोटाळा, ८ क्षेत्रीय कार्यालय स्तरावर घेण्यात आलेले निर्णय व प्रत्यक्ष झालेले कामे, मोजमाप पुस्तिका, त्यानुसार संबंधित ठेकेदारांना अदा केलेली बिले याची सखोल चौकशी केली असता अनेक कामे बोगस पद्धतीने कागदावर दाखवून बिले लाटण्यात आली आहे. या निर्णयांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार व भ्रष्टाचार झाला आहे.

# धक्कातंत्राचाच प्रयोग




**ओडिशात कमळ फुलल्यावर मोहन चरण माझी या आदिवासी समाजातील नेत्याची मुख्यमंत्रीपदी निवड करून भाजपने धक्कातंत्राची परंपरा कायम ठेवली. ओडिशा विधानसभेच्या १४७ पैकी ७८ जागा जिंकलेला भाजप पूर्वेकडील राज्यात एकहाती सत्तेत आला आहे.**

ओडिशात मुख्यमंत्रीपदासाठी अनेक नावांची चर्चा होती; पण गुजरात, राजस्थान, हरयाणा, मध्य प्रदेश, छत्तीसगड या राज्यांप्रमाणेच प्रस्थापित नेत्यांना डावलून भाजपने नवीन चेहरा पुढे आणण्याची परंपरा कायम ठेवली. नवीन पटनायक यांच्या नेतृत्वाखालील बिजू जनता दलाची २४ वर्षांची सद्दी संपवून भाजपला यश मिळाले. भाजपकडून मुख्यमंत्रीपदासाठी प्रस्थापित नेत्याला संधी दिली जाईल, अशी शक्यता वर्तविण्यात येत होती. या दृष्टीने पंतप्रधान नरेंद्र मोदी वा गृहमंत्री अमित शहा यांचे निकटवर्तीय धर्मेंद्र प्रधान यांच्या नावाची चर्चा होती. आतापर्यंत प्रधान हेच ओडिशातील भाजपचा चेहरा म्हणून ओळखले जात. पण केंद्रीय मंत्रिमंडळात प्रधान आणि आदिवासी नेते ज्युएल ओरम यांचा समावेश झाला तेव्हाच मुख्यमंत्रीपदाकरिता नवीन चेहरा असेल हे संकेत मिळाले होते. मुख्यमंत्रीपदी अनपेक्षित नेत्यांना 'नेमण्या'ची नवी परंपरा भाजपच्या शीर्षस्थांनी कायम ठेवली. चौथ्यांदा विधानसभेवर निवडून आलेल्या माझी यांची मुख्यमंत्रीपदी निवड



करण्यात आली. याआधी अशाच प्रकारे, गुजरातमध्ये पहिल्यांदाच आमदार म्हणून निवडून आलेल्या भूपेंद्र पटेल यांची मुख्यमंत्रीपदी निवड करण्याची खेळी यशस्वी झाली होती. सहा महिन्यांपूर्वी मध्य प्रदेशात मोहन यादव, राजस्थानमध्ये भजनलाल शर्मा तर छत्तीसगडमध्ये विष्णू देव साय या तिन्ही मुख्यमंत्र्यांची अनपेक्षितपणे निवड करण्यात आली होती. शिवराजसिंह चौहान, वसुंधराराजे आणि रमणसिंह या दबदबा असलेल्या नेत्यांचा पत्ता कापण्यासाठी भाजपने ही खेळी केली होती हे स्पष्टच आहे. राजस्थानात पहिल्यांदाच विधानसभेवर निवडून आलेल्या भजनलाल शर्मा यांच्याकडे मुख्यमंत्रीपद सोपवण्याचा निर्णय लोकसभा निवडणुकीसाठी तरी यशस्वी झालेला दिसला नाही. कारण २०१४ आणि २०१९ मध्ये सर्व २५ जागा जिंकणाऱ्या भाजपला यंदा १४ जागांवरच समाधान मानावे लागले. तरीही नवीन चेहऱ्यांना सत्तेत महत्त्वाच्या पदांवर संधी देण्याच्या भाजपच्या या प्रयोगाचे स्वागतच करायला हवे. काँग्रेसमध्ये राज्याराज्यांत नेतेमंडळींचे साम्राज्य तयार झाले होते. नेतृत्व बदल करताना त्याच त्या नेत्यांना आलटूनपालटून संधी दिली जायची. भाजपने सत्तेतील प्रस्थापित जातींचे प्रस्थ मोडून काढण्याचा प्रयत्न करतानाच नेतेमंडळींचे महत्त्वही कमी केले. भाजपने महाराष्ट्रात बिगरमराठा, हरयाणात बिगरजाट तर झारखंडमध्ये बिगरआदिवासींकडे भाजपने मुख्यमंत्रीपद सोपविले होते. पण प्रस्थापित जातींचे सत्तेतील महत्त्व कमी करण्याचा हा प्रयोग त्यांच्या अंगलट आला.या पार्श्वभूमीवर ओडिशातील २३ टक्के आदिवासी लोकसंख्या लक्षात घेऊन आदिवासी समाजातील माझी यांच्याकडे मुख्यमंत्रीपद सोपविले असावे. ओडिशातील भाजपचा विजय हा गेली ४० वर्षे पक्ष रुजविण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचे यश मानावे लागेल. आसाममध्ये आसाम गण परिषद तसेच ओडिशामध्ये बिजू जनता दल या प्रादेशिक पक्षाचे बोट पकडूनच भाजपने वाटचाल केली होती. पण नवीन पटनायक यांचे आव्हान मोडून काढणे सोपे नव्हते आणि भाजपनेही त्यांच्याबरोबर युती कायम ठेवली होती. या राज्यातील २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत युतीसाठी १७ दिवस वाटाघाटी करण्यात आल्या होत्या. स्वबळावर लढण्याचा निर्णय झाल्यावर भाजपने नवीन पटनायक यांनाच वैयक्तिक लक्ष्य केले. पटनायक यांच्यावर अक्षरश: टीका आणि आरोपांचा भडिमार केला. ओडिया अस्मितेवर भर दिला. पटनायक यांचे सचिव पंडियन यांचे वाढते प्रस्थ, नवीनबाबूंची प्रकृती, सरकारच्या कारभाराच्या विरोधातील नाराजी, राष्ट्रपतीपदी ओडिशातील द्रौपदी मुर्मू यांची करण्यात आलेली निवड, आदिवासी समाजाला घातलेली साद, आदिवासी भागातील रखडलेला विकास, मतांचे ध्रुवीकरण हे सारेच मुद्दे भाजपला बहुमताचा आकडा गाठण्याकरिता उपयोगी पडले. राज्याची सत्ता तसेच लोकसभेत भाजपचे २१ पैकी २० खासदार निवडून आल्याने ओडिशाच्या राजकारणाचा पोत बदलला आहे. केंद्रात सत्तेची हॅट्रिक केली.

## प्रासंगिक »

### 'उजवे' वारे!

***युरोपीय समुदायाचे संयुक्त कायदेमंडळ असलेल्या युरोपियन पार्लमेंटच्या निवडणुकीत सत्तारूढ मध्यममार्गी पक्षांनी वर्चस्व राखले .***

अनेक मोठ्या देशांमध्ये उजव्या विचारसरणीच्या पक्षांची मुसंडी लक्षणीय ठरली. कडवा राष्ट्रवाद, स्थलांतरितांना विरोध आणि युरोप नामक एकत्रित, एकात्मिक संकल्पनेविषयी कमालीची अनास्था ही अशा विचारसरणीच्या पक्षांची काही ठळक लक्षणे. अद्याप या मंडळींनी युरोपियन पार्लमेंटमध्ये बहुमत मिळवलेले नाही. परंतु युरोपीय समुदायाचे दोन सर्वांत मोठे सदस्य देश जर्मनी आणि फ्रान्समध्ये त्यांनी मोठे विजय मिळवले. इटली या आणखी एका महत्त्वाच्या देशात तेथील सत्तारूढ 'ब्रदर्स ऑफ इटली' या पक्षाने मोठे यश प्राप्त केले. त्या देशाच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी जवळपास २८ टक्के मते जिंकली आणि युरोपमधील राजकीय स्थान अधोरेखित केले. त्यामुळे हे सुरुवातीचे वारे भविष्यात वावटळ निर्माण करून २७ सदस्यीय युरोपियन पार्लमेंटचा ताबा घेऊ शकतात, या शक्यतेकडे डोळेझाक करता येत नाही.

तर विषय असा आहे की काल म्हणजे मंगळवारी एका कुटुंबाच्या बरखास्तीची अधिकृत घोषणा झाली. तुम्ही म्हणाल की सरकार बरखास्त होऊ शकते, पण कुटुंब कसे काय? प्रश्न अगदी रास्त असला तरी तो विचारायचा नाही. याचे एकमेव कारण म्हणजे ही घोषणा खुद्द विश्वगुरूंनी केली आहे.

# आता म्हणतील परिवारसुद्धा 'जुमला'

त्यामुळे त्यांच्या परिवारातील लाखो सदस्यांनी हू की चू न करता 'मोदी का परिवार' ही टॅगलाइन चूपचाप काढून टाकली. पाच वर्षांपूर्वी 'मैं हू चौकीदार' काढली तशीच. आता काही म्हणतील की हा परिवारसुद्धा 'जुमला' होता. दहा वर्षांपूर्वीच्या पंधरा लाखांसारखा. तर त्याला आमचा नाइलाज आहे. कुटुंब, मग ते कुठलेही असो. एकजिनसी असते. त्यात एकमेकांना मदत करण्याची, अडचणीत धावून जाण्याची, संकटसमयी एकत्र राहण्याची भावना असते, असा तर्क कुणी लावत असेल तर ते योग्यच. यावेळच्या निवडणुका हे एक मोठे संकट होतेच. त्याचा सामना करता यावा म्हणून तर हे कुटुंब तयार झाले. तेही त्या बिहारच्या लालूजींच्या एका वाक्यावरून. आता ते संकट टळले. यावर काही म्हणतील पूर्ण कुठे टळले? बहुमत तर मिळालेच नाही. हा त्यांच्या दृष्टीचा दोष. मित्रपक्षांच्या सहकार्याने सत्ता राबवण्यासाठी विश्वगुरू समर्थ आहेत. तसेही एकट्याने (फार फार तर



दुकट्याने) देशाचा गाडा हाकण्याची त्यांना सवय आहे. त्यामुळे कुटुंबाची गरज काय? उगीच सर्वांना त्या परिवाराच्या गाड्यात कशाला अडकवून ठेवायचे याच उदात्त हेतूने त्यांनी हे केले असावे. या परिवाराने यावेळी बरोबर काम केले नाही.कुटुंबाच्या यशासाठी सर्वजण एकदिलाने झटले नाहीत. सर्वजण शंकराच्या पिंडीवर दूध टाकत असताना आपण थोडे पाणी टाकले तर काय फरक पडतो या समजात अनेकजण वावरले. त्यामुळे उद्विग्न होत विश्वगुरूंनी हा निर्णय घेतला हा तर्क तर पूर्णपणे खोटा. तसेही ते विरोधी कुटुंबाशी लढण्यासाठी व त्यांना पुरून उरण्यासाठी एकटेच 'काफी' असतात. यावेळी त्यांना निवडणूक काळातील समाजमाध्यमी युद्ध लढण्यासाठी योग्य 'टॅगलाइन' सापडत नव्हती. पप्पू तशी संधी देत नव्हता. अचानक ती लालूंनी दिली व त्याचा अचूक फायदा त्यांनी उचलला हेच काय ते सत्याच्या जवळ जाणारे. या परिवारात मोठ्या उत्साहाने सामील झालेले माध्यमांवर तलवारबाजी करत राहिले. या नादात प्रचार करायचे विसरले. त्यामुळे कुटुंबाचा पाहिजे तसा विस्तार होऊ शकला नाही व ६० जागा कमी झाल्या यातही फारसे तथ्य नाही. असे असते तर बरखास्तीच्या वेळी कुटुंबप्रमुख या नात्याने विश्वगुरूंनी नक्कीच सर्वांचे कान टोचले असते. कुटुंब ही संकल्पना कधीच नष्ट न होणारी, वंशावळीच्या माध्यमातून पिढ्यानपिढ्या पुढे जाणारी. मग ही बरखास्ती कशी, असे अकलेचे तारे तोडण्याची गरज नाही. राजकारणात तयार झालेली कुटुंबे अशीच अल्पजीवी असतात. कधी ना कधी त्यांचे विसर्जन होतेच. एवढ्या मोठ्या कुटुंब कबिल्याला घेऊन सत्ता राबवतो म्हटले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील)
एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मला राज्य सरकार बदलायचं आहे

## शरद पवारांनी शेतकरी आणि ग्रामस्थांशी साधला संवाद

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनी त्यांच्या पक्षातील नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागण्याचे आदेश दिले आहेत. शरद पवारांनी तर आत्तापासूनच दौऱ्यांना सुरुवात केली आहे. पवारांनी वेगवेगळ्या गावांमधील शेतकरी आणि ग्रामस्थांच्या भेटीगाठी सुरू केल्या आहेत. दरम्यान, इंदापूर दौऱ्यावेळी शरद पवार यांनी शेतकरी आणि ग्रामस्थांशी संवाद साधला. यावेळी पवार ग्रामस्थांना म्हणाले, “चार-सहा महिने थांबा, मला राज्यातलं सरकार बदलायचं आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी सर्वांना रस्त्यावर उतरावं लागेल.**



अस्तित्वाची लढाई बनली होती. मात्र या दोन्ही नेत्यांनी सर्व दावे आणि एक्झिट पोल खोटे ठरवत दमदार पुनरागमन केलं. उद्धव ठाकरेंच्या पक्षाने राज्यात नऊ तर शरद पवारांच्या पक्षाने आठ जागा जिंकल्या. दरम्यान, हे दोन्ही नेते आता आगामी विधानसभा निवडणुकीच्या कामाला लागले आहेत. शरद पवार यांनी आज पुरंदर तालुक्याच्या कोळविहिरे येथे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, तुम्ही चार-सहा महिने थांबा, मला राज्य सरकार बदलायचं आहे. हे सरकार बदलल्याशिवाय आपल्याला शेतकऱ्यांसाठी हवी तशी धोरणं राबवता येत नाहीत. सरकार बदलल्यावर आपण शेतकऱ्यांसाठी कामं करू. शरद पवार म्हणाले, गेले पाच-सहा दिवस राज्यातल्या काही भागांमध्ये एक वेगळं चित्र दिसत होतं. राज्य सरकारनेसुद्धा काही गावं, काही तालुके हे दुष्काळी म्हणून जाहीर केलेले आहेत आणि साधारणत: त्याच्यामध्ये ज्यांचा उल्लेख होता, त्यामध्ये पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुका हा अग्रभागी होता. तेव्हाच मी ठरवलं एखादा दिवस काढायचा आणि काही गावांना जाऊन भेटी द्यायच्या व येणाऱ्या संकटांपासून लोकांची सुटका करण्यासाठी तातडीने काय उपाययोजना करायची? आणि दुसऱ्या बाजूने कायमचा प्रश्न सोडवण्यासाठी दीर्घ स्वरूपाचे काय कार्यक्रम हातामध्ये घेता येतील? त्याची माहिती लोकांकडून घ्यायची आणि त्याच दृष्टीने मी या ठिकाणी आलो. गेल्या दोन-तीन दिवसात वातावरण पूर्णपणे बदललं आहे, पण समाधानकारक नाही. पीकं येतील, अशी स्थिती नाही, चाऱ्याचा प्रश्न सुटला आहे अशी स्थिती या ठिकाणी नाही आणि तुमच्याकडून माहिती घेणे आणि राज्य सरकारशी बोलून मुख्यमंत्री व त्यांच्या सहकाऱ्यांची एक संयुक्त बैठक घेऊन या प्रश्नांची सोडवणूक करण्याची जबाबदारी घ्यावी हा आजच्या भेटीचा माझा उद्देश होता.नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत देशात इंडिया आघाडीने भाजपाप्रणित एनडीएसमोर मोठं आव्हान निर्माण केलं. एनडीएने बहुमत मिळवलं असलं तरी इंडिया आघाडीने तब्बल २३५ जागांपर्यंत मजल मारली. महाराष्ट्रात महाविकास आघाडीने (इंडिया) महायुतीवर (एनडीए) मात केली. मविआने राज्यातील ४८ पैकी ३१ जागा जिंकल्या तर महायुतीला केवळ १७ जागांवर विजय मिळाला. महाराष्ट्रात ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि ज्येष्ठ नेते शरद पवार (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार) यांनी महायुतीसमोर तगडं आव्हान निर्माण केलं. पक्ष फुटल्यानंतर ही निवडणूक ठाकरे आणि पवारांसाठी अस्तित्वाची लढाई बनली होती. मात्र या दोन्ही नेत्यांनी सर्व दावे आणि एक्झिट पोल खोटे ठरवत दमदार पुनरागमन केलं. उद्धव ठाकरेंच्या पक्षाने राज्यात नऊ तर शरद पवारांच्या पक्षाने आठ जागा जिंकल्या. दरम्यान, हे दोन्ही नेते आता आगामी विधानसभा निवडणुकीच्या कामाला लागले आहेत. शरद पवार यांनी आज पुरंदर तालुक्याच्या कोळविहिरे येथे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, तुम्ही चार-सहा महिने थांबा, मला राज्य सरकार बदलायचं आहे.

### दोन-तीन दिवसात वातावरण बदललं

हे सरकार बदलल्याशिवाय आपल्याला शेतकऱ्यांसाठी हवी तशी धोरणं राबवता येत नाहीत. सरकार बदलल्यावर आपण शेतकऱ्यांसाठी कामं करू. शरद पवार म्हणाले, गेले पाच-सहा दिवस राज्यातल्या काही भागांमध्ये एक वेगळं चित्र दिसत होतं. राज्य सरकारनेसुद्धा काही गावं, काही तालुके हे दुष्काळी म्हणून जाहीर केलेले आहेत आणि साधारणत: त्याच्यामध्ये ज्यांचा उल्लेख होता, त्यामध्ये पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुका हा अग्रभागी होता. तेव्हाच मी ठरवलं एखादा दिवस काढायचा आणि काही गावांना जाऊन भेटी द्यायच्या व येणाऱ्या संकटांपासून लोकांची सुटका करण्यासाठी तातडीने काय उपाययोजना करायची? आणि दुसऱ्या बाजूने कायमचा प्रश्न सोडवण्यासाठी दीर्घ स्वरूपाचे काय कार्यक्रम हातामध्ये घेता येतील? त्याची माहिती लोकांकडून घ्यायची आणि त्याच दृष्टीने मी या ठिकाणी आलो. गेल्या दोन-तीन दिवसात वातावरण पूर्णपणे बदललं आहे, पण समाधानकारक नाही. पीकं येतील, अशी स्थिती नाही, चाऱ्याचा प्रश्न सुटला आहे अशी स्थिती या ठिकाणी नाही आणि तुमच्याकडून माहिती घेणे आणि राज्य सरकारशी बोलून मुख्यमंत्री व त्यांच्या सहकाऱ्यांची एक संयुक्त बैठक घेऊन या प्रश्नांची सोडवणूक करण्याची जबाबदारी घ्यावी हा आजच्या भेटीचा माझा उद्देश होता.

# सरकारकडून जाणूनबुजून षडयंत्र रचलं जात आहे

## हे माझं शेवटचं उपोषण, जरांगेंचा सरकारला इशारा!

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आरक्षणासाठी मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटलांनी पुन्हा एकदा उपोषण छेडलं आहे. अंतरवाली सराटीत त्यांनी उपोषणाला सुरुवात केली असून ते आपल्या मागणीवर ठाम आहेत.**

त्यातच, त्यांनी आता मुख्यमंत्र्यांच्या ओएसडींवर (ऑफिसर ऑन स्पेशल ड्युटी) आरोप केले आहेत. त्यांनी दिल्लीत जाऊन षडयंत्र रचल्याचे ते म्हणाले आहेत. तसंच, हे माझं आता शेवटचं उपोषण असल्याचंही ते म्हणाले.मनोज जरांगे पाटील म्हणाले, “ओबीसी नेते समजून घेत नाहीत. ओबीसींच्या आरक्षणाला कोणताही धक्का लागत नाही. ते उगीच तेढ निर्माण करत आहेत. काहीजण इथं प्रसिद्धीसाठी बसले आहेत. जिकडे मराठे आंदोलन करत आहेत, तिथंच त्यांनाही करायंच आहे. त्यांना जातीय तेढ निर्माण करायचा आहे. आणि आम्हाला जातीयवादी म्हणत



आहेत.“हे सरकारचं जाणूनबुजून षडयंत्र आहे. आम्ही मुख्यमंत्र्यांना चांगलं समजत होतो. यापुढेही चांगलं समजत आहोत. आम्हाला कळतं सगळं. कोणाच्या गाड्या येत आहेत. मुख्यमंत्र्यांच्या ओसडीने काय षडयंत्र रचले आहेत. काय डाव रचला आहे. हसून खेळून गोड बोलतील आणि कार्यक्रम प्रत्येकवेळी मराठ्यांचा लावतील”, असाही आरोप त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या ओएसडीवर केला आहे. तसंच ते मराठ्यांच्या अन्नात तेल ओतत असल्याचंही जरांगे पाटील म्हणाले.“षडयंत्र रचून दिल्लीपर्यंत न्यायला लागले आहेत. कोण कुठे जातो, कोण कुठे उतरतो. विमानतळावर कोणाच्या गाड्या आहेत. कोण कोण सोबत आहेत, हे सर्व माहित आहे. मुख्यमंत्र्यांचे ओएसडी लोकांना घेऊन दिल्ली पळत आहेत. तिकडून काय बनवून आणत आहेत माहीत नाही. माझ्या मराठ्यांना बदनाम करण्यासाठी काहीतरी आणलं असे.

### उपोषण केव्हा थांबवणार?


मी मुख्यमंत्री शिंदे, गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांना सांगतो की त्यांनी मला आरक्षणाबाबत संपूर्ण माहिती द्यावी. सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी करणार आहेत, त्याला किती दिवस लागणार आहेत? ओबीसीतून आरक्षण देणार की नाही, सगेसोयऱ्यांची व्याख्या मान्य आहे की नाही ही सर्व माहिती फडणवीसांनी द्यावी. त्याशिवाय उपोषण मागे घेणार नाही. सगळं क्लिअर झालं तर उपोषण स्थगित करायला काही अडचण नाही.

# कुवेतमध्ये 40 भारतीयांचा होरपळून मृत्यू!

## इमारतीच्या मालकाला अटक करण्याचे आदेश

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**



**कुवेतमधील एका इमारतीला लागलेल्या भीषण आगीत ४० भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला आहे. दक्षिण मंगफ जिल्ह्यातील एका इमारतीला ही भीषण आग लागली. आगीमुळे इमारत पूर्णपणे जळून खाक झाली आहे. ज्या इमारतीला आग लागली त्या इमारतीत 160 हून अधिक कामगार राहत होते. ही घटना बुधवारी सकाळची असल्याची माहिती आहे. कुवेतचे उपपंतप्रधान शेख फहाद युसेफ सौद अल-सबाह यांनी घटनास्थळी भेट दिली आणि किमान ४१ कामगारांचा होरपळून मृत्यू झाल्याची पुष्टी केली. घटनास्थळी भेट देताना उपपंतप्रधानांनी इमारतीच्या मालकाला अटक करण्याचे आदेश दिले.**

आज जे काही घडले ते कंपनी आणि इमारतीच्या मालकांच्या लालसेचा हा परिणाम आहे. शेख फहद अल-युसेफ अल-सबाह म्हणाले, मी अशा उल्लंघनांवर त्वरित कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत, जेथे मोठ्या संख्येने कामगार निवासी इमारतीत अडकले आहेत. अधिका-यांनी सांगितले की, आग आटोक्यात आली असून ते त्याच्या कारणाचा शोध घेत आहेत. एका वरिष्ठ पोलिस कमांडरने सरकारी टीव्हीला सांगितले की, ज्या इमारतीत आग लागली ती घरातील कामगारांसाठी वापरली जात होती आणि तेथे मोठ्या संख्येने कामगार होते. डझनभर लोकांना वाचवण्यात आले, परंतु दुर्दैवाने आगीतून बाहेर पडलेल्या धुरामुळे अनेकांचा मृत्यू झाला. तळमजल्यावरील स्वयंपाकघरात (स्थानिक वेळेनुसार) पहाटे 4:30 वाजता आग लागली आणि लगेचच संपूर्ण निवासी अपार्टमेंटमध्ये पसरली. या इमारतीला आग कशामुळे लागली याचा तपास सुरू असल्याचे कुवेती अधिकाऱ्यांनी सांगितले. या दुर्घटनेतून बचावलेल्यांनी दावा केला आहे की आग अचानक वेगाने पसरली आणि अगदी कमी वेळात संपूर्ण इमारतीला वेढले. सकाळ असल्याने सगळे झोपले होते. इमारतीत मोठ्या प्रमाणात लोक राहत असल्याने त्यांना आगीपासून वाचण्याची संधी मिळाली नाही. आगीमुळे निर्माण झालेल्या धुरामुळे गुदमरून अनेकांचा मृत्यू झाला आहे. क्षमतेपेक्षा कितीतरी पट अधिक कामगार या इमारतीत राहत होते. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, त्यांनी इमारतीमध्ये ज्वाळा आणि प्रत्येक खिडक्यामधून धूर निघताना पाहिला. एका प्रत्यक्षदर्शीने एक विशेषतः अस्वस्थ करणारी घटना सांगितली ज्यामध्ये एक कामगार, आगीपासून वाचण्यासाठी हताश होता, त्याने पाचव्या मजल्यावरून उडी मारली आणि बाल्कनीच्या काठावर आदळल्यानंतर दुःखद मृत्यू झाला. इमारतींच्या आतील खोल्यांमध्ये बरेच लोक असल्याने त्यांना बाहेर येण्याची संधी मिळाली नाही, असे त्यांनी सांगितले. इमारतीतल्या ज्या घरात आग लागली त्या घरात केरळमधील एक व्यक्ती वास्तव्यास होती. या इमारतीत राहणारे बहुसंख्य लोक दक्षिण भारतीय नागरिक आहेत. तसेच या आगीत मृत्यू झालेल्या भारतीयांपैकी पाच जण मूळचे केरळचे रहिवासी होते. कुवैत आरोग्य मंत्रालयाने या घटनेची माहिती देत म्हटलं आहे की, या आगीच्या घटनेत आतापर्यंत ४१ जणांचा बळी गेला असून ४० जण जखमी झाले आहेत. जखमींवर उपचार चालू आहेत.

### खिडक्यामधून धूर निघताना पाहिला

आज जे काही घडले ते कंपनी आणि इमारतीच्या मालकांच्या लालसेचा हा परिणाम आहे. शेख फहद अल-युसेफ अल-सबाह म्हणाले, मी अशा उल्लंघनांवर त्वरित कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत, जेथे मोठ्या संख्येने कामगार निवासी इमारतीत अडकले आहेत. अधिका-यांनी सांगितले की, आग आटोक्यात आली असून ते त्याच्या कारणाचा शोध घेत आहेत. एका वरिष्ठ पोलिस कमांडरने सरकारी टीव्हीला सांगितले की, ज्या इमारतीत आग लागली ती घरातील कामगारांसाठी वापरली जात होती आणि तेथे मोठ्या संख्येने कामगार होते. डझनभर लोकांना वाचवण्यात आले, परंतु दुर्दैवाने आगीतून बाहेर पडलेल्या धुरामुळे अनेकांचा मृत्यू झाला. तळमजल्यावरील स्वयंपाकघरात (स्थानिक वेळेनुसार) पहाटे 4:30 वाजता आग लागली आणि लगेचच संपूर्ण निवासी अपार्टमेंटमध्ये पसरली. या इमारतीला आग कशामुळे लागली याचा तपास सुरू असल्याचे कुवेती अधिकाऱ्यांनी सांगितले. या दुर्घटनेतून बचावलेल्यांनी दावा केला आहे की आग अचानक वेगाने पसरली आणि अगदी कमी वेळात संपूर्ण इमारतीला वेढले. क्षमतेपेक्षा कितीतरी पट अधिक कामगार या इमारतीत राहत होते. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, त्यांनी इमारतीमध्ये ज्वाळा आणि प्रत्येक खिडक्यामधून धूर निघताना पाहिला. एका प्रत्यक्षदर्शीने एक विशेषतः अस्वस्थ करणारी घटना सांगितली ज्यामध्ये एक कामगार, आगीपासून वाचण्यासाठी हताश होता, त्याने पाचव्या मजल्यावरून उडी मारली आणि बाल्कनीच्या काठावर आदळल्यानंतर दुःखद मृत्यू झाला. इमारतींच्या आतील खोल्यांमध्ये बरेच लोक असल्याने त्यांना बाहेर येण्याची संधी मिळाली नाही, असे त्यांनी सांगितले.

# 300 कोटींच्या मालमत्तेसाठी सासऱ्याची हत्या!

## आरोपीला 1 कोटी रुपये, बार लायसन्सचे आमिष; 3 जणांना अटक

। नवी दिल्ली ।
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**नागपुरात एका महिलेने सासऱ्याची 300 कोटी रुपयांची संपत्ती हडप करण्यासाठी त्याची हत्या केली. त्यासाठी त्यांनी एक कोटी रुपयांचे सुपारी दिली होती. पोलिसांनी या हत्येचा सूत्रधार असलेली महिला, तिचा भाऊ आणि तिचा पीए यांना अटक केली आहे. खून करणारे तिघे अद्याप फरार आहेत. त्यांचा शोध सुरू आहे.**

अजनी परिसरात हिट अँड रन प्रकरण घडले होते. भरधाव वेगात आलेल्या कारने पुरुषोत्तम पुत्तेवार (72) यांना धडक दिली. या अपघातात त्यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला होता. पत्नीला भेटून परतत असताना पुरुषोत्तमची हत्या करण्यात आल्याचे उघड झाले आहे. त्यांची पत्नी शकुंतला हिचे ऑपरेशन झाले होते, त्यामुळे त्या रुग्णालयात आहेत. पुरुषोत्तम यांचा मुलगा मनीष हा डॉक्टर आहे. चौकशीदरम्यान मनीषची पत्नी अर्चना पुट्टेवार, पुरुषोत्तमची सून हिची भूमिका संशयास्पद दिसली. तेव्हा पोलिसांनी अर्चनाची चौकशी सुरू केली. अर्चना नागपुरात नगररचना विभागात सहाय्यक संचालक म्हणून कार्यरत असून, तिची नियुक्ती गडचिरोलीतही झाली असल्याचे समोर आले. तिनेच सासरे पुरुषोत्तम यांच्या हत्येचा कट रचला होता. त्यात





तिचा चालक सार्थक बागडे, भाऊ प्रशांत आणि पीए पायल यांचा समावेश होता. आधी तिने तिचा भाऊ आणि पीए सोबत पुरुषोत्तमचा खून करण्याचा कट रचला. ड्रायव्हर सार्थकला यात सहभागी होऊन हत्येसाठी एक कोटी रुपयांचे आमिष दाखवले. सार्थकने त्याचे आणखी दोन सहकारी नीरज निमजे आणि सचिन धार्मिक यांना या योजनेत जोडले. योजनेनुसार अर्चनाने दिलेल्या पैशातून जुनी खरेदी केली होती. नीरज निमजे आणि सचिन धार्मिक यांनी पुरुषोत्तम पुत्तेवार यांची 22 मे रोजी कारने धडक देऊन हत्या केली होती. हा किरकोळ अपघात असावा असे त्यांना वाटले. मात्र पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास करून सत्यता शोधून काढली. पोलिसांनी अर्चनाला अटक केली. यानंतर त्याचा भाऊ प्रशांत आणि पीए पायल यांनाही अटक करण्यात आली. पोलिस चौकशीत अर्चनाने सासऱ्याची हत्या केल्याची कबुली दिली आहे. या हत्येसाठी त्याने ड्रायव्हर आणि त्याच्या साथीदारांना एक कोटी रुपये आणि बारचा परवाना देण्याचे आमिष दाखविल्याचे त्याने पोलिसांना सांगितले.

### बेकायदेशीर लेआउट मंजूर

आयपीसी आणि मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चालक बागरे व त्याचे दोन साथीदार अद्याप फरार आहेत. त्याचा शोध सुरू आहे. या खून प्रकरणाचा अधिक तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणात आणखी लोकांचा सहभाग असल्याचा संशय आहे. या प्रकरणाशी पुरावे गोळा केले जात आहेत.अर्चनाविरोधात नगररचना विभागात अनेक तक्रारी आल्याचेही तपासात निष्पन्न झाले असल्याचे पोलिसांनी सांगितले. नियमांचे उल्लंघन करून बेकायदेशीर लेआउट मंजूर केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे.



# रणबीर आणि आलिया न्यूयॉर्कहून परतले



शुक्रवारी मुंबई विमानतळावर अनेक सेलिब्रिटी दिसले. बॉलिवूड अभिनेत्री आलिया भट्टही पती रणबीर कपूरसोबत स्टायलिश लूकमध्ये विमानतळावर दिसली. याशिवाय दिग्गज अभिनेते अनिल कपूर, सोनू सूद, शमिता शेट्टी आणि नुसरत भरुचा हे देखील स्पॉट झाले होते. अलीकडच्या रॉकी और रानी की प्रेम कहानी आणि हॉलिवूड रिलीज हार्ट ऑफ स्टोनच्या यशानंतर आलिया सध्या रणबीरसोबत न्यूयॉर्कला सुट्टीवर गेली होती. या काळातील अनेक व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर समोर आले आहेत. आता दोघेही मुंबईला परतले आहेत. शुक्रवारी हे जोडपे मुंबई विमानतळावर स्पॉट झाले. जिथे दोघेही खूप मस्त आणि कम्फर्टेबल लूकमध्ये दिसले आलिया व्हाईट ओव्हरसाईज टी-शर्ट आणि ब्लॅक पॅंटमध्ये दिसली. काळ्या गॉगल आणि पांढऱ्या शूजने तिने हा लूक पूर्ण केला. तर रणबीर ऑल ब्लू ट्रॅक सूटमध्ये दिसला होता, ज्यामध्ये तो खूपच सुंदर दिसत होता. त्याला पाहताच चाहत्यांनी त्याला चारही बाजूंनी घेरले. त्यानंतर दोघांनीही विमानतळावर चाहत्यांसमोर जोरदार पोज दिल्या. ६६ वर्षीय अनिल बॉलिवूड इंडस्ट्रीतील सर्वात फिट अभिनेत्यांपैकी एक आहे. विमानतळावर तो खूपच देखणा आणि तरुण दिसत होता. चाहत्यांना पाहून अभिनेत्याने त्यांना नमस्कार केला आणि त्यांच्यासोबत सेल्फीही घेतला. नुसरत भरुचाही विमानतळावर स्टायलिश लूकमध्ये दिसली. तिच्या लूकबद्दल बोलायचे झाले तर तिने काळ्या स्वेट शर्टसोबत गुलाबी ट्राउजर घातला होता. आत गेल्यानंतर पापाराझींसाठी हसतमुख पोझ दिली.

## आर्यनने शाहरुख खानला केले मोटिव्हेट

शाहरुख खान आणि त्याच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'जवान' चित्रपटाच्या टीमने नुकतीच मुंबईत एक गेट टुगेदर आयोजित केले होते. यावेळी चित्रपटातील कलाकार आणि क्रूचे सर्व सदस्य एकत्र दिसले. या कार्यक्रमात शाहरुखने तो ब्रेकवर होता तेव्हा त्याला चित्रपटांमध्ये परतण्यास कोणी प्रवृत्त केले हे सांगितले. 'झिरो' चित्रपट फ्लॉप झाल्यानंतर शाहरुखने 2019 मध्ये 3 वर्षांचा ब्रेक घेतला होता. या कार्यक्रमात शाहरुख म्हणाला, 'मी खूप नर्व्हस होतो कारण मी इतकी वर्षे काम केले नाही. तीन वर्षांनंतर चित्रपटाच्या सेटवर परतणे माझ्यासाठी पूर्णपणे नवीनच होते. त्यावेळी माझा मुलगा आर्यन मला म्हणाला – जेव्हा आम्ही मोठे होत होतो तेव्हा तुमचे स्टारडम काय असते हे आम्हाला माहिती होते.. तुमचे स्टारडम काय आहे हे सुहानालाही माहिती होते. पण या छोट्याला (अबराम खान) फक्त तुम्ही स्टार आहात हे माहिती आहे, त्याला तुमचे स्टारडम कधीच जाणवले नाही. त्यामुळे पुढील 5 चित्रपटांसाठी एवढी मेहनत करा की त्याला हे जाणवेल. या कार्यक्रमात शाहरुखने असेही सांगितले की, तो गेल्या 29 वर्षांपासून चित्रपट यशस्वी करण्यासाठी खूप मेहनत घेत आहे.

## नुसरतसह 17 सेलिब्रिटींची ईडी चौकशी



ईडी 5,000 कोटी रुपयांच्या मनी लॉंड्रिंग प्रकरणात दुबईतून ऑनलाइन सट्टेबाजी ॲप चालवणारा सौरभ चंद्राकर आणि त्याचा व्यवसाय भागीदार रवी उप्पल यांची चौकशी करत आहे. आता या प्रकरणात टायगर श्रॉफ, नुसरत भरुचा, सुखविंदर सिंग, नेहा कक्कर आणि सनी लिओनसह 17 सेलिब्रिटींचीही चौकशी होऊ शकते. ईडीच्या तपासात सौरभ चंद्राकरचे फेब्रुवारीमध्ये लग्न झाले आणि त्यासाठी २०० कोटी रुपये खर्च झाल्याचे आढळून आले. हवालाच्या माध्यमातून हा पैसा इव्हेंट कंपनी आणि बॉलिवूड स्टार्सपर्यंत पोहोचला. हे अभिनेते आणि गायक या वर्षी फेब्रुवारीमध्ये महादेव बुक ॲपचे प्रवर्तक सौरभ चंद्राकर यांच्या लग्न समारंभात सहभागी झाले होते. दुबईत झालेल्या या लग्नात सौरभने 200 कोटी रुपये खर्च केले. या सर्व सेलिब्रिटींनीही यावेळी परफॉर्म केले. या प्रकरणात टायगर श्रॉफ, सनी लिओन, नुसरत भरुचा, नेहा कक्कर, आतिफ अस्लम, राहत फतेह अली खान, अली असगर, विशाल ददलानी, एली अबराम, भारती सिंग, भाग्यश्री, क्रिती खरबंदा, कृष्णा अभिषेक आणि सुखविंदर सिंग यांच्यासह अनेक सेलिब्रिटी आहेत. चौकशी केली जात आहे. छत्तीसगडचे रहिवासी सौरभ चंद्राकर आणि रवी उप्पल हे मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात वॉन्टेड आहेत. सौरभ एकेकाळी छत्तीसगडमधील भिलाई येथे ज्यूस विकायचा. ईडीच्या सूत्रांवर विश्वास ठेवला तर चंद्राकरने 18 सप्टेंबर 2022 रोजी दुबईतील 7 स्टार हॉटेलमध्ये पार्टी दिली होती. या पार्टीला काही बॉलिवूड सेलिब्रिटींनी हजेरी लावली, ज्यासाठी त्यांनी 40 कोटी रुपये आकारले.या वर्षी फेब्रुवारीमध्ये झालेल्या लग्नासाठी सौरभने आपल्या कुटुंबीयांना नागपूरहून दुबईला खासगी जेटने बोलावले होते. मुंबईहून बॉलिवूड सेलिब्रिटी, वेडिंग प्लानर, डान्सर्स आणि डेकोरेटर्सही दुबईला पोहोचले. या लग्नात या 17 सेलिब्रिटींनी परफॉर्म केले होते.गेल्या वर्षी डिसेंबरपासून सुरू असलेल्या या प्रकरणाच्या तपासात आता बॉलिवूड कनेक्शन समोर आले आहे. महादेव ऑनलाइन बेटिंग ॲप हे एक गेम ॲप आहे जे 30 केंद्रांवरून ऑपरेट केले जाते. आता त्याचे प्रवर्तक दुबईत आहेत जेथे फलंदाजी बेकायदेशीर आहे. शुक्रवारी या प्रकरणी ईडीने भोपाळ, मुंबई आणि कोलकाता येथील 417 कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे.

## शाहरूखच्या जबरा फॅनची कमाल!

बॉलिवूडचा बादशहा शाहरूख खानचा जवान चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ करत असल्याचे पाहायला मिळत आहे. चित्रपट रोज कमाईचे नवे विक्रम करत असल्याचे समोर येत आहेत. मात्र या चित्रपटासाठी चाहत्यांची उत्सुकतादेखील चर्चेचा विषय ठरत आहे. शाहरूखच्या अशाच एका जबरा फॅनची सध्या प्रचंड चर्चा होत आहे. शाहरूखच्या या खास चाहत्याचे नाव आहे. अनिस फारुकी. शारीरिकदृष्ट्या अपंग असलेल्या या फॅनने चक्क व्हेंटिलेटर थिएटरमध्ये नेत त्याठिकाणी जवान चित्रपटाचा आनंद लुटला आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर त्याने त्याबाबतचा व्हिडिओ शेअर केला असून तो व्हिडिओ सध्या प्रचंड व्हायरल होत आहे. शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये शाहरूखचा एक डायलॉग असलेला व्हिडिओ आहे. हाड डायलॉग पाहण्यासाठीच एवढा सगळा प्रपंच केल्याचे सांगत अनिस बरोबर असलेल्या एकाने हा व्हिडिओ शेअर केला आहे. सोशल मीडियावर अपलोड झाल्यापासून या व्हिडिओला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. लोक अनिसचे कौतुक करत असून, फॅन असावा तर असा, अशा प्रकारच्या प्रतिक्रियादेखील व्यक्त करत आहेत.



## अनिल कपूरने भूमीसोबत रिक्रिएट केले आयकॉनिक गाणे

अभिनेत्री अंकिता लोखंडेने अलीकडेच तिच्या गर्भधारणेच्या अफवांवर चर्चा केली. तिने अशा बातम्या चुकीच्या असल्याचे म्हटले आहे. सोशल मीडियावर बेबी बंपसोबत व्हायरल होत असलेल्या फोटोंवर अंकिताने प्रतिक्रियाही दिली. याशिवाय अभिनेत्रीने तिच्या बाळाच्या नियोजनाबाबतही चर्चा केली. खरंतर, लग्नानंतर अनेकवेळा अंकिता प्रेग्नंट असल्याच्या बातम्या येत आहेत. मात्र, या सर्व केवळ अफवा असल्याचे सिद्ध झाले आहे. अंकिताला तिच्या गरोदरपणाच्या अफवांवर विचारण्यात आले. यावर ती म्हणाली- मी काही पहिली सेलिब्रिटी नाही जी आपल्या वैयक्तिक आयुष्याबाबत अशा निराधार बातम्या ऐकत राहते. प्रत्येक सेलिब्रिटीसोबत असे घडते. ती पुढे म्हणाली- 'सर्व प्रथम, जेव्हा तुम्ही सिंगल नसता तेव्हा तुम्ही लग्न कधी करणार असा प्रश्न सतत विचारला जातो. लग्न झाले आहे, किंवा होणार आहे, अशी अटकळ बांधली जात आहे. यानंतर, जेव्हा तुमचे लग्न होते, तेव्हा बातम्या येतात की तुम्ही गर्भवती आहात किंवा तुम्हाला मुले होत नाहीत. तुमच्याबद्दल या गोष्टी सतत विचारल्या जातात आणि लिहिल्या जातात. कधी-कधी ते घटस्फोटाबाबतही बोलू लागतात, मला वाटतं हे सगळं मीडियात घडत राहतं. संवादादरम्यान अंकिताला विचारण्यात आले की अशा बातम्यांचा तिच्या वैयक्तिक आयुष्यावर परिणाम होतो का? यावर ती म्हणाली- 'मी माझ्याबद्दल अनेक मीम्स पाहिले आहेत. तिचे मॉर्फ केलेले फोटो फेक बेबी बंप दाखवतानाही पाहिले आहेत. खरे सांगायचे तर या गोष्टींचा माझ्या आयुष्यावर काहीही परिणाम होत नाही. मी त्यांच्याकडे लक्ष देत नाही, उलट अशा गोष्टी पाहून हसते. हे सर्व पाहून मला असे वाटते

# सौरभ नेत्रावळकरने रचला इतिहास!

## सॉफ्टवेअर इंजिनिअरने रोहित-विराटचा कोड केला क्रॅक

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली असा खेळाडू आहे, ज्याच्यासमोर खेळपट्टी आणि घातक गोलंदाज यांचा फारसा फरक पडत नाही. पण २०२४ च्या टी-२० विश्वचषकात विराट कोहलीची त्याच्या नावाप्रमाणे तळपताना दिसत नाही. आतापर्यंत झालेल्या तिन्ही सामन्यात विराट १० धावाही करू शकला नाही. दुसरीकडे, रोहित शर्मांने अर्धशतकी खेळी करून स्पर्धेची सुरुवात केली. मात्र अमेरिकेसारख्या लहान संघासमोर दोन्ही दिग्गज निष्प्रभ ठरले. अमेरिकन संघाचा मास्टरमाइंड सॉफ्टवेअर इंजिनिअरने रोहित-विराटला आऊट करण्याचा कोड असा क्रॅक केला की, ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.**



आम्ही बोलतोय त्या सौरभ नेत्रावळकरबद्दल ज्याने सुपर ओव्हरमध्ये पाकिस्तानच्या फलंदाजांना आपल्यासमोर गुडघे टेकायला लावले होते. यानंतर आता याच सौरभ नेत्रावळकरने भारताविरुद्ध शानदार गोलंदाजी करताना पुन्हा एकदा आपली छाप सोडली आहे. सौरभ नेत्रावळकरने विराट-रोहितसारख्या दिग्गजांनाही लोटांगण घालायला भाग पाडले. त्याचबरोबर आयसीसी स्पर्धेत विराट कोहलीला गोल्डन डकवर आऊट करणारा सौरभ नेत्रावलकर पहिला गोलंदाज ठरला आहे. यानंतर पुढच्याच षटकात नेत्रावलरने स्फोटक रोहित शर्मालाही आपल्या जाळ्यात अडकवले. अवघ्या १० धावांवर टीम इंडियाने दोन विकेट गमावल्या होत्या.अमेरिकेचा वेगवान गोलंदाज सौरभ नेत्रावलकर हा भारतीय वंशाचा खेळाडू आहे. सॉफ्टवेअर इंजिनीअर होण्याचे स्वप्न घेऊन तो अमेरिकेत स्थायिक झाला. पण नेत्रावळकरांच्या रक्तातील क्रिकेट टॅलेंट त्याला शांत बसू देत नव्हते. म्हणून त्याने अमेरिकेत आपला क्रिकेट जोपासत अमेरिकेच्या संघात मजल मारली. विशेष म्हणजे यापूर्वी तो भारतीय संघासाठी अंडर-१९ चा विश्वचषक खेळला आहे. त्याचबरोबर त्याने रणजी ट्रॉफी स्पर्धेत मुंबई संघाचे प्रतिनिधित्व केले आहे.आता तो २०२४ च्या टी-३० विश्वचषकात फलंदाजांसाठी काळ ठरताना दिसत आहे. नेत्रावलकरने पाकिस्तानविरुद्धच्या आपल्या प्राणघातक गोलंदाजीने चर्चेत आला.भारतीय संघाने सूर्यकुमार यादव आणि शिवम दुबे यांच्या दमदार भागीदारीच्या जोरावर अमेरिकेचा सात गडी राखून पराभव करत सलग तिसरा विजय नोंदवला. त्याचबरोबर टी-२० विश्वचषकाच्या अ गटातून सुपर ८ फेरीसाठी पात्र ठरणारा पहिला संघ ठरला. या सामन्यात नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना अमेरिकेने २० षटकांत आठ गडी गमावून ११० धावा केल्या. प्रत्युत्तरात सूर्यकुमार यादवने शानदार अर्धशतक झळकावून संघाला सावरले आणि दुसऱ्या टोकाला शिवम दुबेने त्याला चांगली साथ दिली. या दोन फलंदाजांच्या दमदार कामगिरीमुळे भारताने १८.२ षटकांत तीन गडी गमावून १११ धावा करून विजय मिळवला. भारताचा या स्पर्धेतील हा सलग तिसरा विजय असून त्याने सहा गुण घेत सुपर एटमध्ये स्थान निश्चित केले आहेआम्ही बोलतोय त्या सौरभ नेत्रावळकरबद्दल ज्याने सुपर ओव्हरमध्ये पाकिस्तानच्या फलंदाजांना आपल्यासमोर गुडघे टेकायला लावले होते. यानंतर आता याच सौरभ नेत्रावळकरने भारताविरुद्ध शानदार गोलंदाजी करताना पुन्हा एकदा आपली छाप सोडली आहे. सौरभ नेत्रावळकरने विराट-रोहितसारख्या दिग्गजांनाही लोटांगण घालायला भाग पाडले. त्याचबरोबर आयसीसी स्पर्धेत विराट कोहलीला गोल्डन डकवर आऊट करणारा सौरभ नेत्रावलकर पहिला गोलंदाज ठरला आहे.

### टॅलेंट त्याला शांत बसू देत नव्हते

यानंतर पुढच्याच षटकात नेत्रावलरने स्फोटक रोहित शर्मालाही आपल्या जाळ्यात अडकवले. अवघ्या १० धावांवर टीम इंडियाने दोन विकेट गमावल्या होत्या.अमेरिकेचा वेगवान गोलंदाज सौरभ नेत्रावलकर हा भारतीय वंशाचा खेळाडू आहे. सॉफ्टवेअर इंजिनीअर होण्याचे स्वप्न घेऊन तो अमेरिकेत स्थायिक झाला. पण नेत्रावळकरांच्या रक्तातील क्रिकेट टॅलेंट त्याला शांत बसू देत नव्हते. म्हणून त्याने अमेरिकेत आपला क्रिकेट जोपासत अमेरिकेच्या संघात मजल मारली. विशेष म्हणजे यापूर्वी तो भारतीय संघासाठी अंडर-१९ चा विश्वचषक खेळला आहे. त्याचबरोबर त्याने रणजी ट्रॉफी स्पर्धेत मुंबई संघाचे प्रतिनिधित्व केले आहे.आता तो २०२४ च्या टी-३० विश्वचषकात फलंदाजांसाठी काळ ठरताना दिसत आहे.

# भुर्दंड बसला आणि अमेरिकेने टाकली मान!

## अमेरिकेच्या संघाने बलाढ्य भारतीय संघाला विजयासाठी झुंजवलं

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**क्रिकेटच्या पटलावर भारतीय क्रिकेट संघ महासत्ता मानला जातो. क्रिकेटच्या परिघात आता कुठे रांगू लागलेल्या अमेरिकेने बलाढ्य अशा भारतीय संघाला न्यूयॉर्कच्या मैदानावर झुंजवलं पण एका तांत्रिक नियमाने त्यांच्या आव्हानातलं त्राणच निघून गेलं. सूर्यकुमार यादव आणि शिवम दुबे ही मुंबईकर जोडगोळी भारतीय संघाला विजय मिळवून देण्याच्या मोहिमेवर होती. अत्यंत कठीण अशा खेळपट्टीवर एकेरी-दुहेरी धावा काढणंही कठीण होतं. सूर्या-शिवम जोडीने संयम बाळगला आणि मोक्याच्या क्षणी नियम त्यांच्या मदतीला धावून आला.**




१५वं षटक संपलं तेव्हा भारताची स्थिती ७६/३ अशी होती. १११ धावांचं लक्ष्य अवघडच भासत होतं. मात्र या षटकानंतर पंच पॉल रायफेल यांनी भारतीय संघाला पाच धावा पेनल्टी मिळणार असल्याची घोषणा केली. आयसीसी ट्वेन्टी२० वर्ल्डकपच्या प्लेइंग कंडिशन्स ४१.९.४ नियमानुसार गोलंदाजी करणाऱ्या संघाला नवं षटक सुरू करण्यासाठी ६० सेकंद मिळतात. निर्धारित वेळेत षटक सुरू न झाल्यास इशारा देण्यात येतो. तीनपेक्षा जास्त इशारे मिळाले तर चौथ्या वेळेस प्रतिस्पर्धी संघाला पेनल्टी बहाल करण्यात येते. हा नियम नव्याने लागू करण्यात आला आहे. अमेरिकेने डावात नव्या षटकापूर्वी अतिरिक्त वेळ घेतला आणि तोच त्यांच्या अंगलट आला. १६व्या षटकात सूर्या-शिवम जोडीने ६ धावा काढल्या. यामध्ये ५ पेनल्टीच्या धावा जोडण्यात आल्या. यामुळे भारताची धावसंख्या ८७/३ अशी झाली आणि लक्ष्य एकदम खाली आलं. ३० चेंडूत ३५ असं लक्ष्य ३० चेंडूत ३० झाल्याने सूर्या-शिवम जोडीने सुस्कारा टाकला.

### चार धावा मिळू शकल्या नाहीत

बांगलादेशला चार धावा देण्यात आल्या नाहीत. न्यूयॉर्कच्या याच खेळपट्टीवर बांगलादेशचा संघही छोटेखानी लक्ष्याचा पाठलाग करत होता. १७व्या षटकात ओटेनिल बार्टमनचा चेंडू महमदुल्लाने तटवून काढण्याचा प्रयत्न केला. चेंडू महमदुल्लाच्या पॅडला लागून चौकार गेला मात्र दक्षिण आफ्रिकेच्या खेळाडूंनी बादचं अपील केलं आणि पंचांनी बादचा कौल दिला. बाद दिल्यामुळे चेंडू डेड झाला. त्यामुळे बांगलादेशला चेंडू सीमापार जाऊनही चार धावा मिळू शकल्या नाहीत. योगायोग म्हणजे महमदुल्लाने रिव्ह्यूचा निर्णय घेतला. तिसऱ्या पंचांनी मैदानावरील पंचांचा निर्णय बदलत महमदुल्ला बाद नसल्याचा निर्वाळा दिला. महमदुल्लाला जीवदान मिळालं पण बांगलादेशला चार धावा मिळू शकल्या नाहीत. बांगलादेशच्या संघाला चार धावांनीच पराभवाला सामोरं जावं लागलं.

अशी पेनल्टी बसणारा अमेरिका हा पहिलाच संघ ठरला. स्टॉप क्लॉकच्या माध्यमातून षटकांची गती राखली जावी यासाठी १ जूनपासून वनडे आणि ट्वेन्टी२० प्रकारात हा नियम लागू करण्यात आला. हा अगदी नवीन नियम असल्याने अमेरिकेचा कर्णधार आरोन जोन्सला याची कल्पना नव्हती. दोन्ही पंचांनी हा नियम त्याला समजावून सांगितला.काही दिवसांपूर्वी बांगलादेश संघाला लेगबाईज संदर्भात नियमाचा फटका बसला होता.